# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ३१/०७/२०२६ (शुक्रवार )

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन नरखेड** :– फिर्यादी/ पिडीत हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन नरखेड येथे २५७/२०२५ कलम ७४, ७६, ११५(२), ३५१(२),३५२,३(५) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक ०५/०४/२०२५ चे १७/०० वाजता यातील १) हर्षल लक्ष्मण सर्याम,वय २३ वर्ष, रा. सिंदी उमरी, ता. नरखेड जि. नागपूर आणि आरोपी क्र. २) यांनी फिर्यादिस शिवीगाळ करून तीला व तीच्या घरच्यांना मारहाण करण्याची धमकी दिली त्यामुळे फिर्यादिने आरोपीस हटकले असता त्याच वेळी आरोपीतांनी संगणमताने फिर्यादी महिलेस ओढून,जमीनीवर पाडून तीला मारहाण केली व तीचे अंगावरील कपडे फाडून तीचा विनयभंग केला, अशा फिर्यादिच्या रिपोर्टवरून सदरचा गुन्हा नोंद

पोलीस उपनिरीक्षक गणेश पडवार, नेम पोलीस स्टेशन नरखेड यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक ३१/०७/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं ९ श्री ए.ए. आयचीत यांनी नमुद आरोपी १) हर्षल लक्ष्मण सर्याम,वय २३ वर्ष, रा. सिंदी उमरी, ता. नरखेड जि. नागपूर याला १) कलम ७४ भान्यासं मध्ये २ वर्षे सश्रम कारावास व २०००/– रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास, २) कलम ७६ भान्यासं मध्ये ३ वर्षे सश्रम कारावास व २०००/– रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास,३) कलम ११५(२) भान्यासं मध्ये ६ महिने सश्रम कारावास व १०,०००/– रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास,४) कलम ३५१(२) भान्यासं मध्ये ६ महिने साधा कारावास, ५) कलम ३५२ भान्यासं मध्ये ६ महिने साधा कारावास,अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने सरकारी अभियोक्ता श्री अभय जिकार यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा पोलीस निरीक्षक श्रीमती मंगला मोकाशे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन नरखेड , सहा पोलीस

निरीक्षक श्री विशांत नांदगाये, मपोशी/२१८२ निलिमा इनवाते ,नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी मपोहवा दिपाली ढोके, ब. नं. १२६८ पोलीस स्टेशन नरखेड यांनी मदत केली आहे.


## अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी नागपुर ग्रामीण पोलीसांचे आवाहन

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— **पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील मांगली शिवारात अनिल धानोजे यांच्या विटभट्टीजवळील जंगल परिसरात दिनांक २०/०७/२०२६ रोजी एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला. सदर घटनेबाबत कळमेश्वर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद करून मृतदेहाच्या शवविच्छेदनानंतर सदर मृतकाचा मृत्यु हा नैसर्गिक नसुन त्याचा खुन झाल्याचे वैदयकीय अधिकारी यांचे कडील अहवालावरून सदर प्रकरणी कलम १०३ (१) भान्यासं अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

**मृत व्यक्तीचे वय अंदाजे २५ ते ३० वर्षे, उंची सुमारे ५ फूट १० इंच, रंग सावळा, शरीरयष्टी सडपातळ, चेहरा गोल असून उजव्या हाताच्या पंजावर मध्यभागी त्रिशुळ डमरू , अंगठया जवळ स्टार तसेच मनगटाच्या वरील तसेच कोपराच्या खालील भागवर त्रिशूळाचे गोंदण (Tattoo) आहे. डाव्या हातावर मनगटाच्या वरील तसेच कोपराच्या खालील भागवर क्रॉस ; † ) चे चिन्ह मृत व्यक्तीच्या अंगावर निळ्या रंगाचा फुल शर्ट, हिरव्या रंगाची लोअर पॅन्ट व काळ्या रंगाची LUX VENUS 85 CM अंडरवेअर होती.**

**मृतकाचे शरीर चेहरा कुजल्यामुळे सदर वर्णनाच्या आधारे या व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, सदर वर्णनाच्या व्यक्तीबाबत कोणास काही माहिती असल्यास त्यांनी खालील संपर्क क्रमांकावर तात्काळ माहीती दयावी.तसेच कोणत्याही पोलीस स्टेशनला सदर वर्णनाच्या व्यक्तीच्या हरविल्याची तक्रार असल्यास तात्काळ खालील संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा.**

**१) श्री. सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग (मो. ९७६२१६८७८०) किंवा**
**२) पोलीस निरीक्षक श्री. मनोज काळबांडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर (मो. ९०७९२०११००) किंवा**
**३) नियंत्रण कक्ष नागपुर ग्रामीण जिल्हा (मो. ७०६६११२१००)**
**यांच्याशी संपर्क साधावा.**



संभाव्य चेहरा (**reconstructed face**)







# चोरीचे २ गुन्हे उघड, १ आरोपी अटक
# मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक ३१/०७/२०२६ रोजी मौदा पोलीसांनी चोरीचे दोन गुन्हे उघड करून एका आरोपीला अटक केले आहे.

पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत दिनांक २१/०७/२०२६ रोजी फ्लिपकार्ट गोडावुन येथे चोरी झाली आणि दिनांक ३०/०७/२०२६ रोजी मंदीरात चोरी झाल्याप्रकरणी पोलीस स्टेशन मौदा येथे चोरीचे गुन्हे नोंद आहे. मौदा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकार आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी तुफान स्वरूपलाल लिल्हारे, वय २८ वर्षे, रा. झाडगाव, ता. वारासिवनी, जि. बालाघाट (म. प्र.) याला निष्पन्न केले. दिनांक ३१/०७/२०२६ रोजी आरोपी ला झाडगाव, ता. वारासिवनी, जि. बालाघाट (म.प्र.) येथुन ताब्यात घेवुन त्यास सदर गुन्हयात अटक करुन आरोपीकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने वर नमुद दोन गुन्हे केल्याची माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीने गुन्हयात वापरलेले इलेक्ट्रीक कटर मशीन तसेच रोख रक्कम ४३३२/— रूपये असा एकुण किंमती ६३३२/— रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.




## दारूच्या नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवुन सदोष मनुष्यवध करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कुही:—** दिनांक ३०/०७/२०२६ रोजी कुही पोलीस स्टेशन येथे फिर्यादी अजय मुरलीधर ठाकरे, वय ३५ वर्ष, रा. मेंढेगाव, ता. कुही, जि. नागपुर यांनी फिर्याद दिली की, दिनांक ३०/०७/२०२६ रोजी मौजा नवरगाव शिवार कुही ते पाचगाव रोडवर मृतक क्र. १) दिनेश मुरलीधर ठाकरे, वय ३२ वर्ष, रा. मेंढेगाव, ता. कुही व २) सत्यफुला मुरलीधर ठाकरे, वय ६२ वर्ष, रा. मेंढेगाव, ता. कुही. जि. नागपुर हे मृतक क्र. १ चे मोटारसायकल क्र.एम.एच.—४०/बि.व्हि. ७१२८ ने नागपुर येथे दवाखान्यात जात असता यातील बोलेरो पिकअप क्र. एम.एच ३४ ए बी. ४६८३ चा चालक आरोपी **नामे शशांक देशराज लोखंडे, वय ३७ वर्ष, रा. विरखंडी, ता. कुही याने दारू पिवुन दारूचे नशेत त्याचे ताब्यात असलेले वाहन निष्काळजीपणे, भरधाव वेगाने व बेदरकारपणे चालवुन दिनेश ठाकरे**

**यांच्या मोटारसायकल क्र. एम. एच —४०/बि.व्हि. ७१२८ ला जोरदार धडक दिल्याने अपघात होवुन दिनेश ठाकरे आणि सत्यफुला ठाकरे दोघेही मरण पावले.** आरोपी शशांक देशराज लोखंडे, वय ३७ वर्ष, रा. विरखंडी, ता. कुही याला दारूच्या नशेत वाहन चालविल्याने अपघात होवुन मृत्यु होवु शकतो हे माहीती असतांना सुद्धा त्याने त्याच्या ताब्यातील वाहन दारूच्या नशेत भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने चालविल्याने सदर अपघात होवुन दोघांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कुही येथे आरोपी वाहन चालकाविरूद्ध कलम १०५, २८१ भान्यासं सहकलम १८४, १३४/१७७ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ८ लाख ५६ हजार ५० रूपयाचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ३०/०७/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा वाडा बिअर बार भिवापुर येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी धाड टाकली असता वाडा बिअर बार मध्ये एका खोलीत काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) वैभव रमेश सुरसकर, वय २७ वर्ष, २) बंडु श्रिपतराव नागेशे, वय ६३ वर्ष ३) देविदास रामकूष्ण बोरकुटे, वय ३१ वर्ष, ४) सोमेश्वर नामदेव भजभुजे, वय ५४ वर्ष, ५) आषुतोष अशोक मोरे, वय ३१ वर्ष, ६) कीशोर लक्षमन सोनकुसरे, वय ४७ वर्ष, सर्व रा. भिवापुर, ता. भिवापुर, जि. नागपुर ७) रमेश बापुराव देवाळकर, वय ५२ वर्ष, रा. मोखाडा, ता. भिवापुर, जि. नागपुर यांना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ४६,०००/—रूपये, ०९ मोबाईल किंमती २,६५,०००/—रूपये, ०४ दुचाकी वाहने किमंती १,४५,०००/— रूपये, ०१ चारचाकी वाहन किमंती ४,००,०००/— रूपये, असा एकुण ८,५६,०५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# मोकाट जनावरांच्या समस्येवर सावनेर पोलीसांची तत्काळ कार्यवाही

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या मार्गदर्शनात सावनेर पोलीसांनी सावनेर शहरातील मोकाट जनावरांमुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी, अपघाताची शक्यता तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत आवश्यक उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत.

याच अनुषंगाने आज दिनांक ३१/०७/२०२६ रोजी नगरपरिषद सावनेर कार्यालयात मुख्याधिकारी, नगरपरिषद सावनेर व नगराध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली तसेच २३ नगरसेवकांच्या उपस्थितीत आयोजित बैठकीस पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव, पोलीस स्टेशन सावनेर यांनी उपस्थित राहुन मोकाट जनावरांच्या समस्येबाबत तसेच त्यावर करण्यात येणाऱ्या आवश्यक उपाययोजनांबाबत सविस्तर मत मांडून, नागरिकांची सुरक्षितता व वाहतूक सुरळीत राहण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचना मांडल्या. मोकाट जनावरांच्या समस्येवर तातडीने तसेच कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

सावनेर शहरामध्ये मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणे, अपघाताची शक्यता वाढणे तसेच नागरिकांना होणाऱ्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत मोकाट जनावरे पकडून त्यांना कोंडवाड्यात दाखल करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.





# कन्हान शहरातील वाहतूक कोंडी व साप्ताहिक बाजाराच्या समस्येबाबत पोलीस प्रशासनाकडून उपाययोजना सुरू

दिनांक ३१/०७/२०२६ चे एका वृत्तपत्रात सडको १२० का हायवे रोड सिमट कर हुवा १० फिट का, कन्हान पोलीस और प्रशासन की भारी लापरवाही , नागरिको मे अक्रोश अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. सदर बातमीबाबत सविस्तर वस्तुस्थिती अशी आहे की, कन्हान शहरातील मुख्य मार्गावर साप्ताहिक बाजार व अतिक्रमणामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या समस्येबाबत पोलीस विभाग आणि नगरपरिषद कन्हान—पिपरी प्रशासनाकडुन आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

साप्ताहिक बाजारासाठी स्वतंत्र व सुरक्षित जागा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने नगरपरिषद कन्हान—पिपरीचे मुख्याधिकारी यांच्या स्तरावर Land Acquisition भूसंपादनाबाबत ठराव घेण्यात आलेला असून, सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येणार आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने लवकरच साप्ताहिक बाजारासाठी नवीन जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. साप्ताहिक बाजारासाठी नवीन जागा उपलब्ध झाल्यानंतर मुख्य मार्गावरील वाहतुकीवरील ताण कमी होऊन नागरिकांना सुरक्षित व सुरळीत वाहतूक व्यवस्था उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

तसेच मुख्य मार्गावरील वाहतूक सुरळीत राहावी व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या बाबींवर नियंत्रण राहावे यासाठी कन्हान पोलीसांकडुन महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये तसेच मोटर वाहन अधिनियम अन्वये चालानाची कार्यवाही करण्यात येत आहे. नागरिकांची सुरक्षितता व सुरळीत वाहतूक व्यवस्था यांना प्राधान्य देत पोलीस विभाग व नगरपरिषद प्रशासन यांच्या समन्वयाने साप्ताहिक बाजाराच्या स्थलांतरासह आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत असून, सदर समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रशासनाकडून सकारात्मक कार्यवाही सुरू आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**